**महामहिम भूतानचे चौथे राजे यांच्या 70व्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमात पंतप्रधान सहभागी (11 नोव्हेंबर 2025)**

11 नोव्हेंबर 2025

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आज भूतानचे राजे, राजघराणे, सरकार आणि भूतानचे लोक यांच्यासमवेत थिम्फू येथील चांगलिमिथांग स्टेडियमवर आयोजित करण्यात आलेल्या भूतानचे चौथे राजे महामहिम जिग्मे सिंगे वांगचूक यांच्या 70 व्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमात सामील झाले.या प्रसंगी, महामहिम भूतानचे राजे यांनी दिल्ली बॉम्बस्फोटातील पीडितांच्या स्मरणार्थ सामूहिक प्रार्थना केली.

2. पंतप्रधानांनी सभेला संबोधित केले आणि भारतातील जनतेच्या महामहिम चौथे राजे आणि भूतानच्या नागरिकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. भूतान एक आधुनिक राष्ट्र-राज्य आणि घटनात्मक लोकशाही राजेशाही म्हणून उदयास येण्यात महत्त्वपूर्ण ठरलेल्या, महामहिमांच्या परिवर्तनशील कारकिर्दीचा त्यांनी विशेष उल्लेख केला. चौथ्या राजांच्या नेतृत्वाखाली, भूतानने आर्थिक विकास आणि शाश्वततेचा समन्वय साधत 'सकल राष्ट्रीय आनंद' या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेची सुरूवात केली.

3. पंतप्रधानांनी भारत आणि भूतान यांच्यातील विशेष मैत्रीसाठी त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल महामहिम भूतानच्या चौथ्या राजाचे आभार मानले. महामहिम चौथे राजे यांनी अनेक वर्षांमध्ये द्विपक्षीय सहकार्याच्या सर्व क्षेत्रांत भारत-भूतान भागीदारीला स्वतः आकार देत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. पंतप्रधानांनी व्यक्त केले की हा संबंध महामहिमांच्या' मार्गदर्शन आणि सुज्ञ सल्ल्यामुळे पुढेही फायदेशीर राहील.

4. पंतप्रधानांनी महामहिम भूतानचे राजे यांनी चौथ्या राजांच्या गौरवशाली परंपरेला यशस्वीपणे पुढे नेण्यासाठी दाखविलेल्या दूरदृष्टी आणि ठाम प्रयत्नांचे कौतुक केले. महामहिमांच्या' नेतृत्वाखाली भूतानने' साधलेली उल्लेखनीय प्रगती आणि भारत आणि भूतान दरम्यान दृढ मैत्री तसेच घनिष्ठ भागीदारी यांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. पंतप्रधानांचे पूर्ण भाषण येथे पाहिले जाऊ शकते (लिंक)

थिम्फू

11 नोव्हेंबर 2025